पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १६

**सभावृत्तांत**

दिनांक - **०७/०३/२०१९** वेळ - दुपारी २.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षीक सभा **गुरुवार** दिनांक **०७/०३/२०१९** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
**२.** मा.बाबर शर्मिला राजू - **उपसभापती**
३. मा.सोनवणे शारदा हिरेन
४. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
५. तापकीर विनया प्रदीप(आबा)
६. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
७. मा.काळे उषा दिलीप
८. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) कासारवाडी येथील उर्दु शाळेची दुरुस्ती करणेबाबत.– मा.राजू बनसोडे , मा.उषा काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना “Sureboost Sachet” देणेबाबत.- मा.शर्मिला बाबर , मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **२१/०२/२०१९** रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक १५**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ४८ विषय क्रमांक – ०१

दिनांक - ०७/०३/२०१९

सुचक : मा.राजू बनसोडे अनुमोदक : मा.उषा काळे

संदर्भ :- मा.राजू बनसोडे, मा.उषा काळे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महापालिकेची कासारवाडी येथील उर्दु शाळेची अतिशय दुरावस्था झाली असून शाळेचे शौचालय, पाण्याची टाकी खराब झाली असून पेटींग,वायरींग इत्यादी खराब झाले आहे. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. तरी कासारवाडी येथील उर्दु शाळेची दुरुस्ती त्वरीत करुन घेणेकामी मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेच वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४९ विषय क्रमांक – ०२

दिनांक - ०७/०३/२०१९

सुचक : मा.शर्मिला बाबर अनुमोदक : मा.संगिता भोंडवे

संदर्भ :- मा.शर्मिला बाबर , मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागाच्या १०५ शाळा कार्यरत असून या शाळांमध्ये अंदाजे ३८,५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळांमधून शिक्षण घेणारे बहुतांशी विद्यार्थी गोरगरीब व अल्प उत्पन्न गटातील आहेत. तरी हे विद्यार्थी गोरगरीब व अल्प उत्पन्न गटातील असल्याने त्यांना रोजच्या आहारातून पुरेसे व्हिटॅमिन न मिळाल्याने सातत्याने विद्यार्थी आजारी पडणे, अशक्तपणा यामुळे शाळेतील उपस्थितीतवर परिणाम होत असल्याचे निदर्शनास येत आहे. तरी यामुळे पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमध्ये २ वय वर्ष व त्यापुढील वयोगटातील बालवाडी,प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना **“Sureboost Sachet”** उपलब्ध झाल्यास या विद्यार्थ्यांमध्ये रोग प्रतिकारकशक्ती वाढण्यास मदत होणार आहे. यामध्ये कॅरिका पपई अर्क , टिनसपोरा कॉर्डिफोलिया, बकरीचे दुध व व्हिटॅमिन इ. असे घटक आहेत. यामधील कॅरिका पपई व्हायरल इन्फेक्शनमध्ये प्लेटलेटस्ची पातळी वाढवण्यास मदत करते. टिनोसपोरा मध्ये गुडुची असल्यामुळे प्रतिदिन विषाणुजन्य संसर्गाशी लढण्यासाठी प्रतिकार शक्तीची पातळी वाढवते. बकरीच्या दूध पावडरमध्ये जास्त प्रमाणात सेलेनियम असल्याने नैसर्गिक अंटिऑक्साईडेंटस असते आणि व्हिटॅमिन ई देखील असते. अंटिऑक्सिडेंटस फ्री रेडिकल्सची रोकथाम करण्यात मदत करते ज्यामुळे रोग प्रतिकारक शक्ती वाढते. पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमध्ये २ वय वर्ष व त्यापुढील वयोगटातील विद्यार्थी असलेने प्राथमिक शाळांमधील अंदाजे ३८,५०० विद्यार्थ्यांना **“Sureboost Sachet”** देणेबाबत वैद्यकिय विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे मार्फत खातरजमा/ पडताळणी करुन पुढील कार्यवाही करणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाटन न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सोनाली दत्तात्रय गव्हाणे)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/३/कावि/१५७/२०१९
दिनांक : ०८/०३/२०१९

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.